दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

● बीड/महाराष्ट्र ● रविवार दि.२३ फेब्रुवारी २०२५ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक-११९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

## कृषिमंत्र्यांच्या राजीनाम्याबाबत कायदेशीर अभ्यासानंतर निर्णय

**नाशिक**–राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक जिल्हा न्यायालयाने एका प्रकरणामध्ये २ वर्षांचा कारावास आणि ५० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. यानंतर विरोधकांकडून माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. माणिकराव कोकाटे यांच्यासंदर्भात वरिष्ठ नेते कायदेशीर अभ्यास करून निर्णय घेतील, असे जलसंधारण मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले. हा प्रश्न तांत्रिक बाबीत अडकला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः याकडे लक्ष ठेवून आहेत, असेही ते म्हणाले.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील पहिला हप्ता लाभार्थ्यांना देण्यासाठी शनिवारी नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन सभागृहात कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमानंतर जलसंधारण मंत्री गिरीश महाजन यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासह नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाबाबतही भाष्य केले.

# मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देणे माझे सौभाग्य अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघामुळे मराठी शिकलो–पंतप्रधान नरेंद्र मोदी

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था):** अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा राजधानी दिल्ली येथे पार पडला. या कार्यक्रमाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्वागताध्यक्ष म्हणून शरद पवार उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उपस्थितांशी संवाद साधताना मराठी भाषेतून संवाद साधला. यावेळी मराठी भाषेवरील आपले प्रेम देखील मोदींनी व्यक्त केले.पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले, कार्यक्रमाला उपस्थित वरिष्ठ नेता शरद पावर, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष तारा भवाळकर व समस्त मराठी भाषेचे विद्वान, ताराबाईंचे भाषण ऐकल्यावर मी म्हंटले 'फार छान' त्यावर त्यांनी पण मला गुजराती भाषेत उत्तर दिले.देशाच्या आर्थिक राजधानी आणि राज्यातून देशाच्या राजधानीत आलेल्या सर्व मराठी साहित्यिकांना माझा नमस्कार, असे मोदी यांनी मराठीमध्ये म्हटले. आज दिल्लीच्या धर्तीवर मराठी भाषेच्या या कार्यक्रमाचे आयोजन होत आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हे एक भाषेपूर्ते मर्यादित नाही. संत तुकारामांच्या मराठीला दिल्ली अतिशय मनापासून नमन करते.

देशातील तसेच जगातील सर्व मराठी प्रेमिकांना या कार्यक्रमाचे शुभेच्छा देतो आणि आज तर जागतिक मातृभाषा दिवस आहे तुम्ही दिल्लीतील साहित्य संमेलनासाठी दिवस सुद्धा अतिशय चांगला निवडला, असे मोदी मराठीमध्ये म्हणाले. यावेळी मोदींनी संत ज्ञानेश्वरांच्या मराठी भाषेवरील ओळी देखील म्हणून दाखवल्या. मराठी भाषा अमृतापेक्षा जास्त गोड आहे. त्यामुळे मराठी भाषेवर माझे जे प्रेम आहे हे आपल्या सर्वांना माहीत आहे. मी नेहमी मराठीमधील नवीन नवीन शब्दांना शिकण्याचा प्रयत्न करत असतो.महाराष्ट्राच्या जमिनीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे बी पेरले गेले होते आज ते शताब्दी साजरी करत आहे. संस्कृती जपण्याचे काम राष्ट्रीय स्वयंसेवक संघ



गेल्या शंभर वर्षांपासून करत आहे. आरएसएसने जगण्याची प्रेरणा दिली आहे आणि संघांमुळेच मी मराठी भाषेशी जोडलो गेलो आहे. देशात तसेच पूर्ण जगात १२ कोटीपेक्षा जास्त मराठी लोक आहेत. त्यामुळेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचे काम मला करता आले हे मी माझे सौभाग्य मानतो. भाषा केवळ संवादासाठी नाही तर संस्कृतीची संवाहक असते. भाषा समाजात जन्म घेते पण भाषा समाजाच्या निर्माणासाठी महत्त्वाची असते. यावेळी मोदी यांनी समर्थ रामदास यांचे मराठा तितुका मेळावा, याचे वाक्य म्हणून दाखवले.मराठी एक संपूर्ण भाषा आहे. मराठीमध्ये शूरता आहे, वीरता आहे, सौन्दर्य आहे, संवेदना आहे, समानता आहे, समरसता आहे, अध्यात्माचे स्वर आहे आणि आधुनिकतेची लहर पण आहे, मराठी भाषेत शक्ती पण आहे युक्ती पण आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत गाडगेबाबा, गोरा कुंभार, बहिणाबाई अशा अनेक संतांनी मराठी भाषेतून समाजाला नवी दिशा दिली आहे. सुधीर फडके यांच्या गीत रामायणाने देखील मोठा बदल घडवला. छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज आणि बाजीराव पेशवा सारख्या वीर मराठ्यांनी शत्रूंना मजबूर केले. स्वातंत्र्याच्या लढाईत वासुदेव बळवंत फडके, लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर सारख्या सैनिकांनी इंग्रजांची झोप उडवली होती. केसरी आणि मराठा सारखे वृत्तपत्र, राम गणेश गडकरी यांचे नाटक, यातून स्वातंत्र्याचे काम केले.मराठी भाषेने वंचित लोकांना पुढे आणण्यासाठी देखील मोठे कार्य केले आहे. ज्योतिबा फुले, बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठे महान कार्य केले आहे. मराठीने आपल्याला अनेक दलित साहित्यिक पण दिले. मराठी साहित्यात विज्ञान कथा देखील आहेत. महाराष्ट्राने किती प्रगती केली आपली मुंबई महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशाची राजधानी म्हणून वर आली. मुंबई म्हटले की चित्रपटांचा विषय येतो. याच मुंबईने हिंदी चित्रपटांना देखील स्थान दिले. आज तर छावा चित्रपटाचा बोलबाला सुरू आहे. याची सुरुवात देखील मराठी लेखक शिवाजी सावंत यांनीच केले आहे.

# अंबाजोगाईतून जाणारा 'शक्तिपीठ' महामार्ग सुसाट

## १५ दिवसांत जमिनीची मोजणी होणार सुरू

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

नागपूर ते गोवा हे २१ तासांचे अंतर ११ तासांवर आणणाऱ्या 'शक्तिपीठ' महामार्गाच्या कामाला वेग आला आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी थांबलेल्या या प्रकल्पाला पुन्हा गती मिळत असून, येत्या १५ दिवसांत जमिनीच्या अधिग्रहणासाठी संयुक्त मोजणी सुरू होणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ या प्रकल्पाची अंमलबजावणी करणार आहे एमएसआरडीसी' च्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ८०२ किमी लांबीच्या या प्रकल्पासाठी कोल्हापूर वगळता ११ जिल्ह्यांमध्ये संयुक्त मोजणी सुरू होणार असून, त्यासाठीचे शुल्क संबंधित कार्यालयांना आठवड्याभरापूर्वीच जमा करण्यात आले आहे. ८६,३०० कोटी रुपये खर्च अपेक्षित असलेल्या या प्रकल्पासाठी गेल्या वर्षी भूसंपादनाची



प्रक्रिया सुरू झाली होती. त्यासाठी १२ जिल्ह्यांमध्ये २७ भूसंपादन अधिकाऱ्यांची नेमणूकही करण्यात आली होती. मात्र, विधानसभा निवडणुकीपूर्वी कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यांतील शेतकऱ्यांनी या प्रकल्पाला विरोध केल्याने गेल्यावर्षी सप्टेंबरमध्ये भूसंपादनाची अधिसूचना सरकारने स्थगित केली होती. आता हा प्रकल्प पुन्हा सुरू करण्यात आला आहे या प्रकल्पासाठी 'एमएसआरडीसी' ला ९३८५ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करावे लागणार आहे. २६५ हेक्टर वनजमिनीचा समावेश आहे. सोलापूर, सांगली आणि कोल्हापूर या जिल्ह्यांतील ३७७१ हेक्टर जमीन प्रकल्पासाठी लागणार आहे.

केळझरचा गणपती, कळंबचा गणपती, सेवाग्राम, पोहरादेवी, माहूरगड शक्तीपीठ, तख्त सचखंड गुरुद्वारा, औंढा नागनाथ, परळी वैजनाथ, अंबाजोगाई शक्तिपीठ, तुळजापूर, पंढरपूर, अक्कलकोट, सांगलीतील औदुंबर दत्त मंदिर, नरसोबाची वाडी, जोतिबा देवस्थान, महालक्ष्मी मंदिर, संत बाळूमामा यांचे समाधिस्थान आदमापूर, कुणकेश्वर आणि पत्रादेवी ही देवस्थाने जोडली जाणार आहेत शक्तिपीठ' महामार्गासाठी संयुक्त मोजणी प्रक्रिया राबविण्याच्या सूचना सर्व यंत्रणांना दिल्या आहेत. कोल्हापूरवगळता अन्य ११ जिल्ह्यांमध्ये ही प्रक्रिया सुरू होईल. 'एमएसआरडीसी' ने या मोजणीसाठीचे शुल्क संबंधित कार्यालयांना आठवडाभरापूर्वीच जमा केले आहे. मोजणी पूर्ण होताच प्रत्यक्ष भूसंपादन सुरू केले जाईल.

## १२वी च्या परीक्षेत कॉपीचा सुळसुळाट

# फुलंब्रीतील आदर्श विद्यालयात मास कॉपी; जिल्हा परिषद सीईओंच्या पाहणीत उघड





**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

फुलंब्री तालुक्यातील पिंपळगाव वळण येथील येथील आदर्श विद्यालयात सुरु असलेल्या बारावीच्या परीक्षा केंद्रावर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी अचानक भेट दिली असता तेथे कॉप्यांचा सुळसुळाट आढळून आला. पुस्तके, गाईड, नोट्स, चिठ्ठ्या असे ढीगभर साहित्य पथकाने जप्त केले. जिल्हा परिषद सीईओ यांनी शाळेची मान्यता रद्द करण्याचे आदेश दिले आहे. तसेच उर्वरित पेपरसाठी या शाळेतील केंद्रांवर अधिक लक्ष देण्यात येणार असल्याचे मीना यानी सांगितले. आदर्श विद्यालयात शनिवारी बारावीचा गणित विषयाचा पेपर होता. या केंद्रावर दुपारी १२ वाजता जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांनी अचानक भेट दिली. त्यावेळी केंद्रातून अनेक लोक बाहेर पडत होते. तसेच पोलिस देखील केंद्राबाहेर रिकामेच उभे होते. तर परीक्षा केंद्राच्या दोन्ही बाजूंनी कॉपी बाहेर फेकलेल्या आढळून आल्या. प्रत्येक परीक्षा हॉलमध्ये मीना यांच्या पथकाने पाहणी केली असता विद्यार्थ्यांकडे, खिडकीवर पुस्तके आणि चिठ्ठ्या आढळून आल्या. तपासणी केली असता त्या गणित विषयाशी संबंधित होत्या. सीईओ मीना यांचे कडक कारवाईचे आदेश जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये कॉपीमुक्त परीक्षा पार पडावी यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. यासाठी सर्व यंत्रणांना आदेशित करण्यात आलेले आहे. तरीही पिंपळगाव वळण येथील आदर्श विद्यालयामध्ये कॉप्यांचा सुळसुळाट आढळून आला. या प्रकारामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी मीना यांनी संताप व्यक्त केला. संस्था, मुख्याध्यापक, पर्यवेक्षक सह बंदोबस्तावरील पोलीस कर्मचारी व इतर संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. त्यांच्या कडक कारवाईच्या आदेशामुळे जिल्ह्यात प्रचंड खळबळ उडाली आहे.

## राष्ट्रीय महामार्ग वृक्षतोडीमुळे वाटसरूंची शितल सावली हरवली

# पर्यावरण मंत्री पंकजाताई वनक्षेत्र व हरित क्षेत्र वाढीसाठी पुढाकार घ्यावा-डॉ.ढवळे

**बीड (प्रतिनिधी):** मराठवाड्याचे हरितछत्र अवघ्या ५ व बीड जिल्ह्याचे २.५ टक्क्यांवर आलेले असताना केंद्र आणि राज्य शासनाच्या विकास धोरणानुसार महामार्ग रूंदीकरणाच्या कामांमुळे भविष्यात गतिमान अशी दळणवळण व्यवस्था तयार व्हावी यासाठी रस्ते, महामार्ग रूंदीकरणाची कामे करण्यात आलेली आहेत.रस्ते विकासाच्या नावाखाली रस्ते विकास महामंडळाने धुळे ते सोलापूर व बीड ते अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील शेकडो वर्षापुर्वीची चिंच ,वड, कडुनिंब,पिंपळ, औदुंबर सारख्या झाडांची अक्षरक्षः कत्तल करण्यात आली असुन नियमानुसार तोडलेल्या झाडांच्या दहापट झाडे लावण्याची जबाबदारी रस्ते विकास महामंडळावर असतानाही याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा केला जात आहे.

# शिक्षक पात्रता परीक्षा अपात्र शिक्षकांवर कारवाई होणार?; शिक्षण विभागानं घेतला मोठा निर्णय

**छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

राज्यामध्ये १३ फेब्रुवारी २०१३ नंतर नियुक्त झालेल्या शिक्षकांसाठी टीईटी परीक्षा उत्तीर्ण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तरीही हजारो शिक्षक टीईटी परीक्षा उत्तीर्ण झालेच नाही. त्यामुळं आता त्यांच्यावर कारवाई होण्याची शक्यता आहे. अपात्र शिक्षक हे विद्यार्थ्यांच नुकसान करीत असल्याची तक्रार होत असताना आता राज्य सरकारचा शिक्षण विभाग कारवाई साठी पाऊल टाकणार असल्याचं कळतंय.या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत बंब यांनी राज्यातील सर्व शाळांमधील टीईटी परीक्षा न दिलेल्या शिक्षकांची यादी शिक्षणाधिकाऱ्यांकडून मागवली आहे. त्यावरून ते आता सरकारकडे अपात्र शिक्षकांवर कारवाई करण्या साठी पाठपुरावा करणार आहेत. त्यामुळे पात्र असूनही शाळेत शिक्षक म्हणून काम करणाऱ्या आणि पगार उचलणाऱ्या शिक्षकांवर आता गंडांतर येणार आहे.

महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर कसा आणि कुठे पाहाल?*काय प्रकरण आहे? सरकारी आणि त्याचबरोबर सरकारी अनुदान असणाऱ्या शाळांमध्ये शिक्षक हे टीईटी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत शिक्षक म्हणून पात्र होण्यासाठी ही परीक्षा म्हणजे किमान पात्रता मानली जाते. राज्य सरकारने २४ ऑगस्ट २०१८ रोजी एक जीआर काढून जे शिक्षक १३ फेब्रुवारी २०१३ नंतर नियुक्त झाले आहेत, मात्र ते टीईटी परीक्षा उत्तीर्ण झाले नाहीत अशा शिक्षकांनी ३० मार्च २०१९ पर्यंत टीईटी उत्तीर्ण करणे आवश्यक असल्याचे सांगितले होते. मात्र राज्यातील अनेक शिक्षक आजही पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेले नाहीत. सरकारी पातळीवर याबाबत पुढे करावे व कोणतेही पाऊल उचललं नाही त्यामुळेच आता आमदार प्रशांत बंब यांनी हा मुद्दा हातात घेतला आहे. त्यामुळे आता त्यांच्या नोकरीवर गंडांतर येणार असं दिसतंय.२०१३ नंतर राज्यातील जिल्हा परिषदांच्या कार्यक्षेत्रातील सरकारी शाळांमध्ये १,१३२ अपात्र शिक्षक सेवेत असल्याचे आढळले आहे. त्यात सर्वाधिक २६२ शिक्षक छत्रपती संभाजीनगर मध्ये, तर २५४ नागपूरमध्ये कार्यरत आहेत.राज्यभरातल्या सगळ्या जिल्ह्यातील आकडा हा मोठा आहे.गंभीर म्हणजे टीईटी घोटाळ्या नंतर केलेल्या तपासणीत ७ हजार ८८० उमेदवारांना अपात्र घोषित केले आहे. त्यामुळे राज्यातील अपात्र शिक्षकांची संख्या ७ हजार ८०० पेक्षा अधिक आहे. पण अद्यापपर्यंत कारवाई झाली नाही.तर खाजगी अनुदानित, अंशतः अनुदानित आणि विना अनुदानित शाळांमध्ये ही संख्या मोठ्या प्रमाणात आहे. अनेक संस्था चालकांनी या जागा भरून घेतल्याचे समोर आलेलं होतं.



# संपादकीय..

## झटपट श्रीमंत नाद; लाखो गुंतवणूकदारांना गंडा




दादर येथील शिवाजी मंदिर परिसरात टोरेस कंपनीच्या नावाखाली उघड झालेल्या आर्थिक घोटाळ्याने सर्वसामान्य, मध्यमवर्गीय नागरिकांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. दर आठवड्याला ११ टक्के व्याजदर परतावा देण्याचे आमिष दाखवून 'टोरेस' नावाच्या कंपनीने ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करून घेतली. आधी सोने, हिऱ्याचे दागिने विकण्यापासून सुरुवात केलेल्या या कंपनीने गुंतवणुकीच्या माध्यमातून बक्कळ पैसा उभा केला. सुरुवातीच्या काळात सांगितल्याप्रमाणे आठवड्याला व्याजदर परतावा दिला गेला. त्यातून हजारो गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन केला. पण मागील आठवड्यात अचानक या कंपनीच्या सर्व शाखांना टाळे लागल्याचे बघून गुंतवणूकदारांचे धाबे दणाणले. या शाखांच्या बाहेर हवालदिल ग्राहकांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. 'टोरेस'च्या नावाखाली मुंबई, ठाणे व आसपासच्या भागात ज्या शाखा सुरू करण्यात आल्या होत्या, त्यातील जवळपास सव्वालाख ग्राहकांची फसवणूक झाल्याची बाब पोलीस तपासातून पुढे येत आहे. टोरेस कंपनीच्या नावावर ग्राहकांची फसवणूक करणारा फंडा हा काही नवा प्रकार नाही. मुंबईत दोन महिन्यांत पैसे दुप्पट करून देतो, असे सांगणाऱ्या शेरेकर सारख्या अनेक खासगी कंपनीचा वन टू फॉरचा प्रकार गेल्या १५ ते २० वर्षांत मुंबईकरांनी अनुभवला आहे. पण त्यातून काही शहाणपण घेताना कोणी दिसत नाही. म्हणूनच असे प्रकार घडत असावेत.

टोरेस कंपनीने कसे गंडवले ते एकदा पाहू. २०२३ मध्ये 'प्लॅटिनम हरेन प्रायव्हेट लिमिटेड' या कंपनीने 'टोरेस' ब्रँड अंतर्गत सुरुवात केली. दादरमध्ये ३० हजार चौरस फुटांचा भव्य आउटलेट सुरू केला आणि मुंबईत दादरसह ग्रँट रोड, नवी मुंबई, कल्याण आणि मीरा रोड या भागात शोरूम सुरू करण्यात आले. कंपनीने ग्राहकांना भुरळ घालण्यासाठी सेमिनार्स घेतले. त्यात सोने, चांदी आणि हिरे स्टोनवर गुंतवणूक केल्यास तुम्हाला दुप्पट रिटर्न मिळेल. एवढंच नाही, तर एका आठवड्याला पैसे मिळण्याचे वचनही देण्यात आले. गेल्या वर्षभरापासून मुंबईतील अनेक भागांत याच योजनेच्या माध्यमातून डिसेंबरपर्यंत कंपनीने नियमित पैसे ग्राहकांना परत दिले होते.

टोरेस कंपनीत गुंतवणूक करणाऱ्यांना अवघ्या ४ हजार रुपयांपासून गुंतवणूक करता येत होती. ही कंपनी रविवारी पैसे गुंतवल्यास सोमवार ते शुक्रवारदरम्यान त्याचा परतावा देत असे. सहा लाखांपर्यंतच्या गुंतवणुकीवर कंपनीकडून ६ टक्के व्याज देत होती. तर सहा लाखांपेक्षा जास्त गुंतवणूक केल्यास गुंतवणूकदारांना ११ टक्के व्याज मिळत होते. सुरुवातीच्या काळात टोरेस कंपनीने उच्चभ्रू इमारतीत घरे, गाड्या आणि दागिने असा आकर्षक परतावा काही ग्राहकांना दिला. त्यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास बसला. मुंबईत गुंतवणुकीवर घसघशीत रिटर्न्स देणाऱ्या टोरेस कंपनीच्या बिझनेस मॉडेलची सातत्याने चर्चा होत होती. यानंतर अनेकांनी डोळे झाकून लाखो रुपये टोरेस कंपनीत गुंतवले. मात्र टोरेस कंपनीने आपला गाशा आता गुंडाळला आहे.

एकट्या दादर शाखेतील गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याप्रकरणी शिवाजी पार्क पोलिसांनी कंपनीच्या पाच अधिकाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. त्यात सुमारे १३ कोटी ४८ लाख रुपयांची फसवणूक झाल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. एकूण सगळ्या बंद शाखेतील ग्राहकांनी पोलीस ठाण्यात तक्रारी करण्यास सुरू केली आहे. 'टोरेस ज्वेलरी' या नावाखाली आतापर्यंत तब्बल सव्वालाख लोकांची एक हजार कोटींची फसवणूक झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. पोलिसांनी या प्रकारात कंपनीच्या तीन वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना अटक केली असली, तरी कंपनीच्या दोन संस्थापकांनी विदेशात पलायन केले. ते दोघे युक्रेनचे नागरिक आहेत. पैसे मिळणे सोडाच; परंतु आकर्षक व्याजाच्या आमिषापायी अनेक कुटुंबावर मोठं आर्थिक संकट उभे राहिले आहे. कंपनीवर विश्वास ठेवून दुप्पट रिटर्नच्या अपेक्षेने कुटुंबाचे दागिने गहाण ठेवून गुंतवणूक केली. पण आता दागिने गायब झाले, अशी एका गुंतवणूकदाराची प्रतिक्रिया आहे. तर दादर येथील भाजी विक्रेते प्रदीपकुमार वैश्य यांनी साडेचार कोटी रुपयांची गुंतवणूक या कंपनीत केली होती. भाजीच्या दुकानासमोरच टोरेसचे आलिशान कार्यालय होते. सुरुवातीला एक लाख रुपयाच्या गुंतवणुकीवर आठवड्यात व्याज मिळाल्यानंतर त्याने कुटुंबीयांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले. अवघ्या सात महिन्यांत वैश्य यांनी सर्वाधिक साडेचार कोटी गुंतवले. त्यांच्या तक्रारीवरून शिवाजी पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. भविष्यात पोलीस आरोपींना पकडतील.

काही महिन्यानंतर प्रकरण शांत झाल्यावर आरोपींना जामीन मिळेल. मात्र गुंतवणूकदारांना स्वतःच्या घामाची मूळ रक्कम पुन्हा मिळविण्यासाठी कोर्टाच्या आदेशाची प्रतीक्षा करावी लागणार आहे; परंतु अशा आर्थिक घोटाळ्याला जसे लोभी गुंतवणूकदार जबाबदार आहेत, हे आपण मान्य करायला हरकत नाही; परंतु असे घोटाळे रोखण्यासाठी पोलीस प्रशासनापासून शासकीय यंत्रणा सुस्त आहेत, असे नाही का वाटत? बँकांनीही किती व्याजदर द्यावे, याचे निकष रिझर्व्ह बँक ठरवते. त्यामुळे आठवड्याला, महिन्याला व्याजदर देणारी कंपनी आपल्या परिसरात कार्यरत असेल तर स्थानिक पोलिसांनी त्याकडे लक्ष द्यायला नको का? तरुणांनी एकत्र येऊन नवा व्यवसाय सुरू करायचा म्हटला तर, त्यासाठी लागणाऱ्या परवानगीसाठी अनेक कष्ट सहन करावे लागतात. तर मग, असे गैरप्रकार घडत असतील तर रोखण्यासाठी सरकारी बाबूंनी स्वतंत्र यंत्रणा उभारायला नको का? टोरेस कंपनीच्या गुंतवणूकदारांवर पश्चात्तापाची वेळ आली आहे. आम्हाला व्याज नको. पण आम्ही गुंतवलेले पैसे तेवढे परत करा, या मागणीसाठी त्यांचा आता संघर्ष सुरू झाला आहे.

# नव वर्ष अन् आपल्या जबाबदाऱ्या!




नव वर्ष, नवा आरंभ नमस्कार! २०२५ हे वर्ष संयुक्तराष्ट्र महासभेने क्वॉटम (र्रिरिरा) विज्ञान आणि तंत्रज्ञान तसेच आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष म्हणून घोषित केले आहे. या सहकारिता वर्षात परस्परांना सहकार्य आणि प्रोत्साहन देत नव्या वर्षाचे स्वागत करू या. क्वॉटम विज्ञान ही भौतिक शास्त्राची एक महत्त्वाची शाखा असून तेथे अतिसूक्ष्म कणांच्या वर्तणुकीचा अभ्यास केला जातो. नव वर्ष : नवा संकल्प : स्वतःचे स्वप्न साकार करण्यासाठी केलेला संकल्प जीवनात बदल घडवून आणतो. वैयक्तिक संकल्पापेक्षा देशातील किंवा समाजातील प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने हे नव वर्ष एक चांगली संधी आहे. कारण नव वर्ष आनंदाबरोबर नव्या अपेक्षा आणते. आपण सर्वांनी देशाच्या प्रश्नासाठी संकल्प करून आपली जबाबदारी उचलू या. जागतिक हवामान परिषदेत प्रत्येक राष्ट्रांनी आपापल्या कार्बन उत्सर्जनात कपात करावी असा करार मंजूर झाला. जीवसृष्टी नष्ट होत असताना जगातून २०५० पर्यंत शून्य कार्बन उत्सर्जन हे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कोळशाचा इंधनाचा कमीत कमी वापर करून इतर नूतनीकरण ऊर्जेकडे किंवा अक्षय ऊर्जेकडे (सौर, पवन) वळणे जरुरी आहे. हवामान बदल ही जागतिक समस्या धर्म, जात, पंथ, वर्ग, वर्ण असा भेद न करता समस्त लोकांचे हाल वाढवीत आहे. जगापुढील पर्यायाने भारतापुढेही हा ज्वलंत प्रश्न आहे. आपल्यापुढील पहिले आव्हान हवामान बदलाचे परिणाम आपण पाहत आहोत. नवी दिल्लीत हवेचा दर्जा अत्यंत खाली घसरला आहे. मुंबईतील हवा धुरकट. जनता सातत्याने आजारी. यावर्षी दिवाळीपर्यंत पडणाऱ्या पावसाने शेतीचे झालेले नुकसान, या साऱ्याला आपणच जबादार आहोत. कारखान्यांमधून बाहेर पडणारे पाणी, हवा त्याहीपेक्षा किंवा त्याचबरोबरीने आपल्या घराघरांत अन्न, पाणी, विजेची होत असलेली नासाडी, कचरा बाहेर टाकणे, थुंकणे, रोजच्या रोज दूध-भाजीसाठी प्लास्टिक पिशव्यांचा वापर, मोसमाच्या आधी फळे पिकविणे या सर्वसामान्यांच्या कृतीच हवामान बदलला कारणीभूत आहेत हे सिद्ध झालंय.दुसरे आव्हान सलोखा बहुभाषिक, बहुप्रांतीय भारतात समस्यांना चौकट घालताच येणार नाही. समस्या असूनही प्रत्येकाच्या रोजच्या मैत्रीमध्ये विभिन्न भाषिक, प्रांतीय, धर्मीय सण उत्सवात एकोपा/देवघेव खूप चांगली आहे; परंतु त्या जवळच्या व्यक्तींच्या व्यतिरिक्त जो तो आपल्यामध्येच. ओळखत असूनही ओळखच नाही असे वागणे असते. काही अपवाद वगळता माणसामाणसांत, नात्यांत इतका तुटकपणा, अलिप्तपणा वाढलाय. कुणालाही एकमेकांशी बोलायला, बघायला किंवा मदतीसाठी स्वतःचा वेळ द्यायलाही तयार नाहीत. शेजारचे १० दिवस नव्हते तरी आम्हाला समजले नाही. माणूस माणसापासून दुरावत चाललाय. तेव्हा स्वतःहून हात पुढे करा. तिसरा प्रश्न : मोबाईल; मास मीडियामुळे जग जवळ आले. मोजके अपवाद वगळता त्याचा उपयोग स्वतःचा आवाका वाढविण्यासाठी, स्वतःचे भविष्य घडविण्यासाठी न होता सेल्फी,चॅटिंगमध्ये वेळ जातोय. रिमोट जरी आपल्या हातात असला तरी स्वतःवर ताबा नसतो. चौथा प्रश्न घरचे खाणे, भविष्याकडे पाहता आजची गरज हा उद्याचा यक्षप्रश्न ठरतो. आरोग्यासाठी नितांत गरज असलेल्या घरच्या खाण्यासाठी स्वयंपाकात प्रत्येकाचा सहभाग असावा. माहीत असलेल्याच प्रश्नाकडे नवी आव्हाने म्हणून नव्याने मूल्यमापनाची गरज आहे. म्हणून नव वर्ष : आपल्या जबाबदाऱ्या हे शीर्षक लिहिले.मला समाजासाठी काहीतरी करायचे, मला असा बदल घडवून आणायचा आहे जो इतिहासाच्या पानावर लिहिला जाईल. कॉलेज युवती प्राची शेवगांवकर. तिने स्वतःचे, त्याशिवाय ११० देशांतील लोकांच्या मदतीने २५ लाख कार्बन उत्सर्जन कमी केले. विचार करा, आपण येथे काय करू शकतो. १. आज प्रत्येकाची गाडी, उबेर, रिक्षामधून होणारा स्वतंत्र प्रवास, प्रत्येक टप्प्यावर कार्बन फूट प्रिंट वाढवतो. २. लिफ्टमुळे एक-दोन जिनेही चढण्याचा आज तरुण कंटाळा करतात. ३. आपण वीज गेल्यावर काहीकाळ राहतो; परंतु वीज असताना दहा मिनिटेही वीज बंद ठेवत नाही. ४. टप्प्याप्प्याने प्लास्टिकचा वाढणारा वापर आपण कमी करू शकत नाही. आपल्यासमोरील विक्रेत्याला, ग्राहकाला सांगूनही उपयोग होत नाही. हे जमिनीवर पडलेले प्लास्टिक, त्या प्लास्टिकमुळे होणारे समुद्राचे प्रदूषण, त्यातून धोक्यात आलेली सागरी परिसंस्था वाचविण्यासाठी नेदरलँडच्या १३ वर्षांच्या शाळकरी मुलीने लीली प्लॅट हिने प्लास्टिक मुक्तीसाठी प्लास्टिक सूप ही मोहीम जगभर सुरू केली. युनायटेड नेशनने ती मोहीम उचलून धरली. ५. वापरा आणि फेका ऐवजी बऱ्याच वस्तूचा आपण पुनर्वापर करू शकतो. पुनर्वापर करणे ही कंजूसी नव्हे. ६. प्रत्येक वॉर्डमध्ये विशिष्ट जागी हरित पट्ट्याची बांधणी हवी. ७. आपल्या पंतप्रधानांचा मंत्र आईच्या नावाने कमीतकमी एक झाड लावा नि जोपासा. मुंबईत राणीच्या बागेत गेट नंबर ४ येथे अगदी कमी पैशात मोठी वाढणारी झाडे दिली जातात. ८. सार्वजनिक वाहनांचा उपयोग करणे आता गरजेचे आहे.सुमेधा चिथडे ह्यांनी लोकांच्या मदतीने सियाचीन येथे प्रथम, नंतर जम्मू-काश्मीर मधल्या कुपवाडा येथे सैनिकांसाठी पहिला ऑक्सिजन प्लांट व रिफिलिंग सेंटर उभे केले आहे. देश आणि समाजातील प्रश्नांवर अनेक व्यक्ती, संस्था कार्यरत आहेत. त्यांना हातभार लावू शकतो, सहभागीही होऊ शकतो. मी भारतीय आहे. आपली जबाबदारी ओळखा. हे नवीन वर्ष तुमच्या आयुष्यात एक नवी दिशा ठरावी यासाठी माझ्या शुभेच्छा!

# योग्य वेळेत परीक्षेचा पेपर कसा सोडवाल?



नवीन वर्षाच्या शुभेच्छा देत असताना जानेवारी महिन्याचे दोन आठवडे कधी गेले हे समजले सुद्धा नाही आणि दोन आठवड्याने फेब्रुवारी महिना सुरू होईल, तेव्हा फेब्रुवारी महिन्यापासून महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या परीक्षा सुरू होतील. म्हणजे महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या १०वी आणि १२वीच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च या कालावधीत होणार असून दहावीची परीक्षा २१ फेब्रुवारी ते १७ मार्च या कालावधीत घेतली जाणार आहे. तेव्हा बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी अनेक प्रश्नपत्रिका सोडविल्या असतील. मात्र अंतिम परीक्षेचा पेपर सोडविताना विद्यार्थ्यांनी काळजी घेणे आवश्यक आहे. कारण त्यांची ओळख या परीक्षेच्या गुणांमुळे होत असते. तेव्हा कोणत्याही प्रकारे विद्यार्थ्यांनी पेपर सोडवताना घाई न करता दिलेली वेळ व विचारलेले प्रश्न यांची सांगड घालून त्यांची उत्तरे बिनचूक लिहिणे आवश्यक आहे. यासाठी आपण वर्षभर अभ्यास करत असतो. तेव्हा आता अंतिम परीक्षेत किरकोळ चुका करून चालणार नाही.विद्यालयामध्ये प्रत्येक विषयाचे अध्यापक प्रश्नपत्रिका कशी सोडवावी या विषयी मार्गदर्शन करीत असले तरी काही विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेविषयी चिंता वाटत असते. जर संबंधित विषयाचा अभ्यास झाला असेल तर विद्यार्थ्यांना चिंतेचे मुळीच कारण नाही. जसजशी परीक्षेची तारीख जवळ येते तसतसे दडपण वाढते याची सुद्धा कल्पना सर्वांना असते. मात्र मनावर दडपण न घेता बिनधास्तपणे परीक्षेला सामोरे गेले पाहिजे. दहावी आणि बारावीच्या परीक्षांचा विचार करता विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे असतात. तेव्हा पेपर सोडवताना विद्यार्थ्यांनी काळजी घेतली पाहिजे.

या दोन परीक्षांवर विद्यार्थ्यांची पुढील दिशा ठरत असते. ज्या दिवशी पेपर असेल त्या वेळच्या नियोजनाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी लागेल. पेपरची वेळ असेल त्या अगोदर किमान अर्धा तास परीक्षा केंद्रावर गेले पाहिजे. आपली आसन व्यवस्था पाहावी तसेच काही सूचना दिल्या असतील तर त्या वाचाव्यात. जर परीक्षा केंद्रावर उशिरा गेलात तर विद्यार्थी चलबिचल होतो. त्याला आयत्या वेळी काहीच सुचत नाही. त्यामुळे तो टेन्शनमध्ये येऊ शकतो. हे टाळण्यासाठी परीक्षेच्या वेळेच्या अगोदर परीक्षा केंद्रावर यावे. अंतिम परीक्षेची प्रत्येकाला चिंता वाटत असली तरी या कालावधीत आपला विश्वास स्वत:च वाढवला पाहिजे. बऱ्याचवेळा आपला अभ्यास झालेला असून सुद्धा प्रश्न कसे विचारले जातील? मला उत्तर लिहिता येईल का? असे अनेक प्रश्न मनात निर्माण होऊ शकतात. तेव्हा असे प्रश्न निर्माण न करता आपलं डोकं शांत ठेवून मनमोकळेपणानं राहावं. परीक्षा केंद्रावरील ज्या रूममध्ये बैठक व्यवस्था केलेली असेल त्याठिकाणी शांत जाऊन बसणे. वेळेनुसार उत्तर पत्रिका पर्यवेक्षकांनी आपल्या हातात दिल्यावर आवश्यक माहिती खाडाखोड न करता अचूक भरावी. महत्त्वाची बाब म्हणजे परीक्षा क्रमांक अचूक लिहावा. तसेच पेन्सिलने प्रत्येक पानावर समास आखून घ्यावा. यामुळे उत्तरपत्रिका आकर्षित दिसते.

प्रश्नपत्रिका आपल्या हातात आल्यावर आपली वेळ सुरू होते. काही विद्यार्थी प्रश्नपत्रिका वाचनात वेळ घालवितात. नंतर वेळ अपुरी पडली अशी बोंबाबोंब करतात. त्यामुळे प्रथम पूर्ण प्रश्नपत्रिकेवर नजर फिरवावी. नंतर जे प्रश्न आपल्याला सोपे वाटतात ते अगोदर सोडवावे, मात्र ते सोडवीत असताना उजवीकडील गुणांकडे लक्ष द्यावा. प्रत्येक प्रश्न स्वतंत्र पानावर सोडवावा. उपप्रश्नांची उत्तरे एकाखाली एक लिहावीत. दोन प्रश्नांच्या उत्तरांमध्ये एक ओळ सोडावी. नंतर उत्तरे क्रमशः लिहिण्यात यावीत. जर एखाद्या प्रश्नाचे उत्तर येत नसेल तर त्यात वेळ घालवू नये. जो प्रश्न कठीण वाटेल तो प्रश्न शेवटी सोडविण्यात यावा. किंवा अशा प्रश्नाला पर्यायी प्रश्न आहेत का हे पाहावे. नंतर आपल्या मनाने उत्तर लिहिण्याचा प्रयत्न करावा. त्यासाठी आधी प्रश्न समजून घ्यावा लागेल. पेपर लिहिताना मुख्य प्रश्न व उपप्रश्न यांच्या क्रमानुसार क्रमांक असतील ते लिहावेत. उत्तर एक क्रमांक वेगळा असेल तर पूर्ण गुण दिले जात नाहीत. तेव्हा क्रमांक लिहून क्रमांकाचे उत्तर लिहावे. त्यामध्ये किती शब्दांत विचारले असेल किंवा किती ओळीमध्ये विचारले असेल तर त्या पद्धतीने उत्तर सुटसुटीत व मुद्देसूद लिहावीत. उत्तर लिहिताना घाई करू नये. प्रत्येक प्रश्नाला वेळ ठरवावा त्यानुसार त्या प्रश्नाला वेळ द्यावा. म्हणजे पूर्ण पेपर सोडवून होईल. त्यासाठी परीक्षा होईपर्यंत अधूनमधून अभ्यासाबरोबर घड्याळ लावून प्रश्नपत्रिका सोडवावी. त्यामुळे अंदाज येऊन वार्षिक परीक्षेला अधिक जोमाने प्रश्नपत्रिका सोडवू शकतो. त्यासाठी अक्षर वळणदार व मोठे तसेच दोन शब्दामध्ये योग्य अंतर असावे. जास्त खाडाखोड, शाईचे डाग, अक्षरे डबल गिरवणे अक्षरावर आडवी रेघ मारणे अशा गोष्टी टाळाव्यात. असे असल्यास शिक्षकही उत्साहाने पेपर तपासण्यास टाळाटाळ करतात. याचा परिणाम विद्यार्थ्याला कमी गुण मिळू शकतात. तेव्हा अशा चुका विद्यार्थ्यांनी करू नयेत. अक्षर कसे आहे यापेक्षा अचूक उत्तर लिहिले आहे का हे महत्त्वाचे आहे. तेव्हा केवळ सुंदर अक्षराकडे जाऊ नका प्रश्नाला अनुसरून उत्तर अपेक्षित असते. अशा गोष्टी टाळून विद्यार्थ्यांनी वार्षिक परीक्षेचा पेपर सोडवावा.

# ऍपा क्रिकेट चॅम्पियन्स चषक स्पर्धा २०२५
# वैद्यनाथ संघ विजेता तर सनरायजर्स संघ उपविजेता

## डॉ.राजेश इंगोले ठरले 'द मोस्ट व्हॅल्यूएबल प्लेअर' तर डॉ.प्रदीप सोनवणे 'मालिकावीर' पुरस्काराने सन्मानित

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई मेडीकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित क्रिकेट स्पर्धेत अंतिम फेरीत वैद्यनाथ संघास विजेतेपद तर सनरायझर्स संघास उपविजेतेपद मिळाले.दोन्ही तुल्यबळ संघात झालेल्या अटीतटीच्या अंतिम सामन्यात वैद्यनाथ संघाने अखेर बाजी मारली. साखळी सामन्यांमध्ये सलग चार विजयांचा धडाका लावत सनरायझर्स संघाने अंतिम फेरीत दिमाखदार प्रवेश केला होता. त्यांचा विजयाचा वारू अंतिम फेरीमध्ये मात्र वैद्यनाथ इलेव्हन संघाने आडवत त्यांना मात दिली. अंतिम सामन्यामध्ये वैद्यनाथ इलेव्हन संघाने सनरायझर्स संघाला दहा षटकांत विजयासाठी एकशे सोळा धावांचे लक्ष दिले. परंतु, सनरायझर्स संघाला केवळ शंभर धावा करता आल्या. कर्णधार प्रदीप सोनवणे यांच्या ३२ चेंडूतील तडाखेबंद ७० धावांमुळे वैद्यनाथ संघाला आव्हानात्मक धावसंख्या उभारण्यात यश आले डॉ.प्रदीप सोनवणे यांना स्पर्धेतील मालिकावीर आणि अंतिम सामन्यातील सामनावीर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




स्पर्धेमध्ये सनरायझर्स संघाला आपल्या दमदार फलंदाजी आणि गोलंदाजीने अंतिम फेरीपर्यंत नेलेल्या डॉ.राजेश इंगोले यांना अंतिम फेरीत मात्र आपल्या संघास विजय प्राप्त करून देण्यात अपयश आले. पाच पैकी चार सामन्यांमध्ये सामनावीराचा पुरस्कार पटकविणारे डॉ.राजेश इंगोले यांना स्पर्धेतील 'द मोस्ट व्हॅल्यूएबल प्लेयर' या अत्यंत महत्त्वाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ.राजेश इंगोले यांनी पाच सामन्यात ६७ च्या सरासरीने २५० धावा तर गोलंदाजी करताना चार सामन्यांमध्ये सात बळी मिळवून अष्टपैलू कामगिरी केली त्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. हा सामना पाहण्यासाठी अनेक डॉक्टर्स तसेच क्रिकेटप्रेमींनी मैदानावर गर्दी केली होती. कार्यक्रमाचे बक्षीस वितरण अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, माजी नगराध्यक्ष राजकिशोर (पापा) मोदी, जेष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा, संपादक बालाजी तोंडे, दीनदयाळ बँकेचे अध्यक्ष ऍड.मकरंद पत्की, योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर यांची प्रमुख उपस्थिती होती. या सामन्यासाठी पंच म्हणून बिंबीसार वाघमारे व संघर्ष इंगळे, स्कोअरर म्हणून चाफा भडके व प्रा.अनंत कांबळे तर समालोचक म्हणून डॉ.देवराव चामनर, डॉ.सचिन कस्तुरे, डॉ.संदीप जैन यांनी कामगिरी बजावली. या स्पर्धांच्या यशस्वितेसाठी ऍपाच्या कार्यतत्पर अध्यक्षा डॉ.सुलभा पाटील, उपाध्यक्ष डॉ.सुनील नांदलगावकर, सचिव डॉ.ऋषिकेश घुले, क्रीडासचिव डॉ.बी.डी.माळवे, डॉ.नजीरूद्दीन, डॉ.विवेक मुळे यांनी परिश्रम घेतले. क्रीडासचिव डॉ.बी.डी.माळवे यांनी यावेळी अत्यंत कल्पकतेने डॉक्टर्सच्या क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन केले, त्याबद्दल त्यांचा मान्यवरांच्या हस्ते सहृदय सत्कार करण्यात आला. योगेश्वरी महाविद्यालयाच्या मैदानात सुरू असलेल्या ह्या क्रिकेट स्पर्धा अत्यंत जल्लोषात व अनोख्या उत्साहाच्या वातावरणात संपन्न झाल्या.

# माणिकराव कोकाटेंची आमदारकी रद्द करुन हकाल पट्टी करा:कॉंग्रेस प्रदेशाध्यक्षांची आक्रमक भूमिका

**मुंबई (वृत्तसंस्था):** रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी घेऊन लाल बहादूर शास्त्री यांनी राजीनामा देऊन आदर्श घालून दिला आहे. पण आत्ताच्या सत्ताधारी भाजपाने नैतिकतेला हरताळ फासला आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांना फसवणूक प्रकरणी न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा ठोठावल्यानंतर त्यांनी तात्काळ राजीनामा द्यायला हवा होता किंवा सरकारने त्यांचा राजीनामा घ्यायला हवा होता पण तसे झाले नाही. आता महामहिम राज्यपाल यांनीच या प्रकरणात लक्ष घालून माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा घ्यावा व त्यांची आमदारकी रद्द करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

महाराष्ट्र एसटी कामगार कॉंग्रेसने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिराला कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भेट दिली, त्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना ते पुढे म्हणाले की, कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर मानहानीच्या एका बोगस प्रकरणात न्यायालयाने शिक्षा ठोठवली असता सचिवालयाने अर्ध्या रात्रीच त्यांची खासदारकी रद्द केली, त्यानंतर त्यांचे शासकीय घरही सोडण्यास भाग पाडले तसेच



कॉंग्रेसचे नेते व माजी मंत्री सुनिल केदार यांना न्यायालयाने शिक्षा ठोठावताच त्यांची आमदारकी तात्काळ रद्द करण्यात आली पण माणिकराव कोकाटे यांच्याबाबतीत वेगळा न्याय आणि विरोधी पक्षांच्या नेत्यांसाठी वेगळा न्याय कसा, असा प्रश्न विचारून कोकाटे प्रकरणात सरकार लोकशाही पद्धतीने वागत नाही असे सपकाळ म्हणाले.

गोविंदगिरी महाराजांच्या विधानावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आणि संघ स्वयंसेवक यांची तुलनाच होऊ शकत नाही. हा महाराजांचा आणि मावळ्यांचा अपमान करण्याचा प्रयत्न आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकेला विरोध करणारा विचार हा संघाच्या विचाराशी मिळता जुळता आहे. शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या शौर्याबद्दल अफवा पसरवण्याचे काम ते सातत्याने करत आहेत. मावळ्यांचा विषय जातीच्या पलीकडचा आहे, ते कोणत्या जाती धर्माचे नव्हते तर स्वराज्याच्यासाठी लढणारे छत्रपतींचे सैन्य होते. हेच गोविंदगिरी देवेंद्र फडणवीस यांना छत्रपती शिवाजी महाराजांना जिरेटोप घालून त्यांना महाराज बनवण्याचा प्रयत्न करत होते. जिरेटोप हे शिवाजी महाराजांचे प्रतिक आहे ते सुद्धा आरएसएस बळकावू पहात आहे, असे कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

# मंत्र्यांचे आचार-विचार शुद्ध असावेत
# आरोप झाले की प्रथम राजीनामा द्यावा

## अण्णा हजारे यांचा मंत्री धनंजय मुंडे यांना अप्रत्यक्ष सल्ला

**अहिल्यानगर (वृत्तसंस्था):** मंत्र्यांचे आचार-विचार शुद्ध हवेत. त्यामुळे त्यांच्यावर आरोप झाला की पहिल्यांदा जबाबदारी म्हणून त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला पाहिजे, असे मत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी व्यक्त केले आहे. सद्यस्थितीत सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात सत्ताधारी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. अण्णा हजारे यांच्या या विधानाचा त्यांच्याशी संबंध जोडला जात आहे.

कृषि खात्यातील कथित घोटाळा व बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे अडचणीत सापडलेत. देशमुख हत्या प्रकरणात त्यांचा राईट हँड मानल्या जाणाऱ्या वाल्मीक कराडला अटक करण्यात आली आहे. त्याच्यावर मकोका



अंतर्गत कारवाईही करण्यात आली आहे. यामुळे सत्ताधारी भाजपचे आमदार सुरेश धस यांच्यासह विरोधी पक्षांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. या पार्श्वभूमीवर अण्णा हजारे यांनी उपरोक्त मत व्यक्त केले आहे.पत्रकारांनी शुक्रवारी अहिल्यानगर येथे अण्णा हजारे यांना धनंजय मुंडे व कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावरील आरोपांविषयी विचारणा केली. त्यावर अण्णा हजारे या दोघांचेही नाव न घेता म्हणाले, मंत्रिमंडळात असणाऱ्या मंत्र्यांवर आरोप झाल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम जबाबदारी म्हणून आपल्या पदाचा राजीनामा द्यावा. यामुळे स्वतःचीच प्रतिमा निर्मिती होते. कारण, जनता आपल्याकडे पाहून अनुकरण करते. त्यामुळे तुम्हीच वाट सोडून जात असाल तर जनता कुठे जाणार? अशा लोकांना मंत्रिमंडळात घेण्यापूर्वी विचार करण्याची गरज आहे.मंत्र्यांचे आचार-विचार शुद्ध असावेत. सुरुवातीला हे चुकले की नंतर अशा घटना घडता.. त्यामुळे राज्याचे, समाजाचे व पर्यायाने देशाचे नुकसान होते. यावर विचार करण्याची गरज आहे. अण्णा हजारे यांनी या विधानाद्वारे धनंजय मुंडे यांना अप्रत्यक्षपणे राजीनामा देण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे आता मुंडे त्यांचा सल्ला मानणार काय? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## खेळाच्या मैदानांचा खेळासाठीच वापर करा
# अजित पवार यांचे निर्देश;भूखंड भाडेपट्टा नूतनीकरणासाठी नवीन धोरण ठरवणार

**मुंबई (वृत्तसंस्था):** खेळांना आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे राज्य सरकारचे धोरण आहे. मुंबईतील ओव्हल मैदान, आझाद मैदान व क्रॉस मैदानातील भूखंडांच्या भाडेपट्टा कराराचे क्रीडा क्लबसोबत नूतनीकरण करण्यासाठी महसूल, क्रीडा, सार्वजनिक बांधकाम व नगरविकास विभागाने एकत्र येऊन समन्वयाने स्वतंत्र, सर्वसमावेशक धोरण तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज दिले. कोणत्याही परिस्थितीत खेळांची मैदाने केवळ खेळांसाठीच वापरण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. मुंबईतील आझाद मैदान, क्रॉस मैदान आणि ओव्हल मैदानातील भूखंडांच्या भाडेपट्टा कराराच्या नूतनीकरणासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी (दूरदृश्य प्रणालीद्वारे), क्रीडा विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. के. एच. गोविंदराज, सार्वजनिक बांधकाम विभाग (रस्ते)चे सचिव सदाशिव साळुंखे, क्रीडा विभागाचे आयुक्त हिरालाल सोनवणे (दूरदृश्य प्रणालीद्वारे), नियोजन विभागाचे सहसचिव दीपक देसाई, महसूल विभागाचे उपसचिव धनंजय निकम, नगरविकास विभागाचे सहसचिव निर्मलकुमार चौधरी, विधी व न्याय विभागाच्या उपसचिव मनिषा कदम, मुंबईचे अतिरिक्त



जिल्हाधिकारी रविंद्र कटकधोंड, मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक, उपाध्यक्ष संजय नाईक, सचिव अभय हडप, सहसचिव दीपक पाटील, खजिनदार अरमान मल्लिक, कार्यकारी सचिव सी. एस. नाईक, सदस्य संदीप विचारे, प्रमोद यादव आणि महाव्यवस्थापक किंजल पटेल आदी मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, मुंबईतील आझाद मैदान, ओव्हल मैदान व क्रॉस मैदान ही सर्व खेळांसाठी महत्त्वाची मैदाने आहेत. या मैदानांवर हजारो क्रीडापटू रोज विविध क्लबच्या माध्यमातून प्रशिक्षणासह खेळाचा सराव करत असतात. या तिन्ही मैदानाची मालकी महसूल विभागाची आहे. क्रीडा विभागामार्फत ती खेळाच्या क्लबला भाडेपट्टा कराराने देण्यात येतात. सध्या या तिन्ही मैदानांवरील भूखंडांवर साठहून अधिक क्लब खेळाडूंना प्रशिक्षणाच्या व सरावाच्या सुविधा देतात. या क्लबचा भाडेपट्टा करार संपला असून तो पुन्हा करण्यासाठी महसूल विभाग, क्रीडा विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग व नगरविकास विभागाने एकत्र येऊन समन्वयाने एक स्वतंत्र, सर्वसमावेशक धोरण तयार करावे. हे नव्याने तयार करण्यात येणारे धोरण मंजुरीसाठी मंत्रिमंडळासमोर ठेवून त्याला अंतिम स्वरूप देण्यात येईल.

# फोडाफोडी सरकारचा स्थायीभाव असल्याने १० वीचा मराठी भाषेचाही पेपर फुटला

## आमदार रोहित पवार यांचा सरकारवर निशाणा

**मुंबई (वृत्तसंस्था):** फोडाफोडी हा सध्याच्या राज्य सरकारचा स्थायीभाव आहे. त्यामुळेच दहावीचा मराठीचा पेपर देखील फुटला असल्याची टीका शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. विशेष म्हणजे मराठी भाषेचा देखील पेपर फुटत असेल तर हे दुर्दैवच आहे, असे देखील त्यांनी म्हटले आहे. या माध्यमातून रोहित पवार यांनी राज्य सरकारवर निशाणा साधला आहे.

या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी एका पोस्टच्या माध्यमातून राज्य सरकारवर टीका केली आहे. आज मातृभाषा दिन असून दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन सुरु झाले आहे. त्याची आजच सुरुवात झाली आहे. असे असताना महाराष्ट्रामध्ये मराठी भाषेचा पेपर फुटत असेल तर हे दुर्दैव असल्याचे रोहित पवार यांनी म्हटले आहे. लगे रहो महायुती सरकार, असे म्हणत त्यांनी राज्यातील महायुती सरकारवर टीका केली. आता महाराष्ट्र थांबणार नाही, या महायुती सरकारच्या घोषवाक्याचा देखील रोहित पवार यांनी खोचक शब्द उल्लेख केला आहे.या संदर्भात आमदार रोहित पवार यांनी एक पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे. या पोस्टमध्ये त्यांनी राज्य सरकारवर टीका केली. या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, 'फोडाफोडी हा या सरकारचा स्थायीभाव असल्याने १० वीचा मराठी भाषेचाही पेपर फुटला विशेष म्हणजे आज मातृभाषा दिन असून दिल्लीत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनालाही आजच सुरवात झाली तरी मराठी भाषेचाही पेपर फुटत असेल तर हे दुर्दैवच आहे लगे रहो महायुती सरकार! महाराष्ट्र आता थांबणार नाही!'

# राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राचार्य विष्णुपंत रसाळ यांना जाहीर

**बीड । प्रतिनिधी**

मांजरसुंबा येथील जीवन कला मंडळ बीड संचलित डॉ . पारनेरकर महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य विष्णुपंत रसाळ सर यांना शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल पहाट फाउंडेशनच्या वतीने देण्यात येणारा २०२५ यावर्षीचा राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. शेगाव येथे उद्या रविवार दि. २३ फेब्रुवारी रोजी भव्य कार्यक्रमात केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव, भास्करराव पेरे पाटील (आदर्श सरपंच पाटोदा) यांच्यासह इतर मान्यवरांच्या हस्ते रसाळ सर यांना देऊन गौरविण्यात येणार आहे .

प्राचार्य विष्णुपंत रसाळ सर हे गेली ३५ वर्षापासून शिक्षणाचा प्रचार व प्रसार करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यासाठी कार्यरत आहेत. शिक्षण क्षेत्राबरोबरच सामाजिक क्षेत्रातील त्यांचे खूप मोठे योगदान आहे. त्यांनी अनेक आदर्श विद्यार्थी घडविले आहेत. त्यांचे अनेक विद्यार्थी आज प्रशासकीय सेवेत कार्यरत आहेत. शिवाय शिक्षण सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातही त्यांच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय काम केले आहे. त्यांना यापूर्वी जिल्हा व राज्य पातळीवरील अनेक मानाचे गौरव पुरस्कार मिळालेले आहेत . रसाळ सर यांनी बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे जिल्हा सचिव, गणित अध्यापक मंडळाचे जिल्हाध्यक्ष तसेच जिल्हाध्यक्ष शिक्षक सेना जिल्हा बीड म्हणून व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेले आहे . या कामाची दखल घेऊन छत्रपती संभाजी नगर येथील पहाट फाउंडेशनच्या संचालिका अर्पिता सुरडकर यांनी राष्ट्रसंत गाडगेबाबा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी ही निवड केली आहे. सदरील पुरस्काराचे उद्या रविवार दिनांक २३ रोजी भव्य कार्यक्रमांमध्ये मान्यवरांच्या हस्ते वितरण होणार आहे. प्राचार्य विष्णुपंत रसाळ सर यांना हा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे जीवन कला मंडळ बीडचे अध्यक्ष गंगाधरराव आगलावे, सचिव गणेशराव जहागीरदार, कार्याध्यक्ष अशोकराव महाजन, कोषाध्यक्ष मुरलीधरराव देशपांडे व सर्व संचालक, शालेय समिती सदस्य अरुणराव कुंडलकर सर, धर्मराज रसाळ सर, शिक्षणाधिकारी मा . नागनाथ शिंदे साहेब , उपशिक्षणाधिकारी नानाभाऊ हजारे साहेब, काकडे साहेब , अधीक्षक बहिर साहेब, खटावकर साहेब, लेखाधिकारी थोरात साहेब, मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे विभागीय सचिव प्राचार्य पैठणे जे एम, बीड जिल्हा मुख्याध्यापक संघाचे उपाध्यक्ष शंकर पवार सर, गणेश घोडके सर , लक्ष्मणराव इंगोले सर, प्राचार्य रामहरी कदम, मांजरसुंबा येथील सरपंच सौ मनिषाताई रसाळ , उपसरपंच शेख अजिज व सर्व ग्रामपंचायत सदस्य, गणित अध्यापक मंडळ बीड जिल्हा सचिव बन्सी हावळे , शिक्षक सेना बीड जिल्हाध्यक्ष गौतम चक्रे , सचिव सतीश रसाळ, दिलीप डावकर, विलास अनवणे, गोपाळ पवार, लक्ष्मणराव मळेकर, प्राध्यापक सरवदे सर, मुळे सर, झोडगे आप्पा इत्यादी प्राचार्य, मुख्याध्यापक , प्राध्यापक , शिक्षक, पालक व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.



# सोनीजवळा येथे विविध विकास कामांचा लोकार्पण सोहळा व महाआरोग्य तपासणी शिबिर

## ग्रामीण भागाच्या विकासासाठी शिवसेना कायम तत्पर–सचिन मुळूक







**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील सोनीजवळा येथे शिवसेनेच्या वतीने विविध विकास कामांचे लोकार्पण झाले.चिमणाजी बुवा मंदिर समोरील सिमेंट रस्ता,सावता वस्ती सोनी जवळा १०० के व्ही डीपी ७.९६ लक्ष,सोनीजवळा गावठाण १०० के व्ही डी पी ७.८१ लक्ष रुपयांच्या कामांचा लोकार्पण सोहळा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळूक यांच्या हस्ते संपन्न झाला.मुंबई पोलीस मध्ये निवड झालेली सबिया शेख हिचा नागरी सत्कार करण्यात आला.

लोककल्याण आरोग्य केंद्र मुंबई व केज तालुका शिवसेना आयोजित महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन झाले. मुंबई पोलीस मध्ये निवड झालेली सबिया निजाम शेख यांचा जाहीर सत्कार यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख सचिन (भैय्या) मुळूक, सोनीजवळा सरपंचपती गोविंद ससाणे, प्रमुख उपस्थिती पृथ्वीराज पाटील शिवसेना तालुकाप्रमुख, शिवसेना केज विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाणे, शंकर (बापू) ससाणे तंटामुक्ती अध्यक्ष सोनीजवळा, मिनाज पठाण आंबा सह.साखर कारखाना संचालक तथा ग्राप सदस्य सोनीजवळा, सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार डॉ हनुमंत सौदागर, दशरथ चवरे, शिवसेनेचे तालुका सचिव विकास काशीद, उपतालुकाप्रमुख महेंद्र चाटे, उपतालुकाप्रमुख कैलास उगलमुगले, उपतालुकाप्रमुख चंद्रकांत इंगळे, विभाग प्रमुख दत्ता काकडे, युवासेना शहर प्रमुख आकाश चाळक, युवासेना उपतालुकाप्रमुख शिवाजी गायकवाड, सोनीजवळा गावचे माजी सरपंच रत्नाकरजी भांडवलकर, निवृत्त मंडळाधिकारी भागवत पवार साहेब, व्यंकटी (नाना) करपे,अविनाश ससाणे ,

आदी प्रमुख उपस्थित होते.यावेळी बोलताना सचिन भैय्या मुळूक म्हणाले ग्रामीण भागात जितका अधिक निधी उपलब्ध करून देता येईल तेवढा आमचा प्रयत्न आहे. एका ऊसतोड मजुराची मुलगी मुंबई पोलीस मध्ये निवड होते ही अभिनंदन या बाब आहे गावाने एकत्र येऊन काम केल्यास गावाचा विकास गतीने होईल असे मत व्यक्त केले.कार्यक्रमाचे अध्यक्ष गोविंद ससाने म्हणाले गावाच्या विकासासाठी पक्ष पार्टी न पाहता आम्ही सर्वजण एकत्र येऊन काम करत आहोत आपण गावासाठी क्रीडांगण, वस्तीवर सिंगल फेज डीपीची आवश्यकता आहे पुढील काळात त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा असे मत व्यक्त केले.मिनाज पठाण म्हणाले माजी उपसभापती दादासाहेब ससाणे यांनी जिल्हा परिषद निवडणूक लढवावी आम्ही त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू प्रश्न सोडवण्याची धमक त्यांच्यात आहे असे मत त्यांनी व्यक्त केलेयेणाऱ्या कालावधीत जिल्हा परिषदेसारख्या निवडणुकांसाठी आम्ही तुम्हाला बळ देऊ , दादासाहेब ससाणे कायम कामासाठी सक्रिय आहेत नागरिकांचे प्रश्न सोडवत रहा जनता तुम्हाला साथ देईल आणि यासाठी आम्ही तुम्हाला बळ देऊ असे मत मूळक यांनी व्यक्त केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिवसेनेचे केस विधानसभा प्रमुख दादासाहेब ससाने यांनी केले.कार्यक्रमास ग्रा.प.सदस्य कल्याण पवार, महादेव वसेकर, माजी सरपंच बाबासाहेब ससाणे ,तुळशीराम सूर्यवंशी, जगन्नाथ ससाणे ,रामकृष्ण भांडवलकर ,अरुण करपे ,सतीश ससाणे ,श्रीराम ससाणे ,महेश ससाणे ,राहुल करपे ,श्रीकृष्ण गिरी ,उद्धव गिरी, हुसेन पठाण ,आसिफखा पटेल, राजू पटेल, अंगद ससाणे ,सावता ससाणे ,त्रिंबक भांडवलकर, बाबूखा पठाण, मधुकर पटेकर, रतन पटेकर, अरुण पटेकर, सोमनाथ ससाणे ,चंद्रकांत ससाणे ,सोमनाथ कल्याण ससाणे ,श्रीमंत गायकवाड, मकरध्वज सूर्यवंशी, वैजनाथ गायकवाड, अमोल भांडवलकर, विलास ससाणे ,बालासाहेब कोकाटे, रज्जाक पठाण ,भालचंद्र भांडवलकर, अरुण भांडवलकर, सत्तार शेख ,वैजनाथ ससाणे ,विनोद महाजन, पप्पू पवार, गणेश दिवटे, धनराज दातार, बाळासाहेब ससाणे, दत्ता मोरे, बहादुर भांडवलकर, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ हनुमंत सौदागर यांनी केले. शिबिरात मोठ्या संख्येने रुग्णांची तपासणी करण्यात आली कार्यक्रमास नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



सोमेश्वर मंदिर बीड येथील अखंड हरिनाम सप्ताह निमित्त ह भ प भाऊसाहेब जोशी राज पिंपरीकर यांचे सुश्राव्य किर्तन संपन्न झाले यावेळी नवनाथ शिराळे पाटील सर्व महिला भक्तगण यावेळी बीड शहरातील भावी भक्त उपस्थित होते

# शिवरायांनी अठरापगड जातींना एकत्र करून स्वराज्याची निर्मिती केली–सलीम जहाँगीर

**बीड (प्रतिनिधी):** देशात सर्व जातीधर्मातील लोक गुण्यागोविंदाने राहत आहेत. काही राजकीय पक्षांनी स्वार्थासाठी जाती–जातीत वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे. जात, उपजात असा कोणताच प्रकार माणूसकीला मान्य नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातींना एकत्र करून स्वराज्याची निर्मिती केलेली आहे. त्यामुळेच आज त्यांचे विचार सर्वच राजकीय पक्षाच्या नेत्यांनी आत्मसात करणे गरजेचे असल्याचे मत भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे प्रदेश महामंत्री सलीम जहाँगिर यांनी व्यक्त केले.

पेठ बीड भागातील गजानन नगर येथे द्रोणागिरी प्रतिष्ठानच्या वतीने आयोजीत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती उत्सव कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी मोठ्या उत्साहात शिवजयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी बोलतांना सलीम जहाँगिर म्हणाले की, विविध राजकीय पक्षांनी आपल्या स्वार्थासाठी जाती–जातींमध्ये वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. मात्र अशा वादामुळे सामाजिक वातावरण दुषित होते. त्यामुळे खर्या अर्थाने छत्रपती शिवाजी महाराज यांचे विचार आत्मसात करून सर्व जातीधर्मातील लोकांना एका धाग्यात गुंफण्याचा प्रयत्न सर्वांनी करणे आवश्यक आहे. गजानन नगर भागात अठरापगड जातीधर्मातील लोक गुण्यागोविंदाने राहतात. एकमेकांच्या सणउत्सवात सहभागी होतात. मला नगरसेवक करण्याकरीता सर्व जाती धर्मातील लोकांनी आशिर्वाद दिले. त्यामुळेच माझ्या आयुष्याची राजकीय सुरूवात होऊ शकली असेही सलीम जहाँगिर यांनी सांगितले. यावेळी सुदाम शिंदे, साळूंके, गरूड बाप्पु, जयदत्त थोटे, सुनिल काटे, राहुल नागटिळक, , ड.सुनिल काटे, सुदामराव शिंदे सर, पवार मामा, ड.नितीन शिंदे,नितीन काळे, दळवी सर, दत्ता काटे,गरूड काका, जयदत्त थोटे, राहुल यादव , अजिंक्य देवडकर , सोमेश्वर मैंदड , सुशांत उपरे ,राहुल नागटिळक , मंगेश कदम, प्रसाद पंडित , उमेश कदम, सूरज किंनकर , अमोल कदम, पवन पंडित गणेश बोचरे आदींची उपस्थिती होती.

# अबॅकसच्या माध्यमातून सोमनाथ गिते सरांनी विद्यार्थ्यांच्या मनातील गणिताची भीती दूर केली–केंद्रप्रमुख संभाजी सोनवणे

## शिवजन्मोत्सव दिनी गिते सरांच्या जी चॅम्प अबॅकसच्या मुलांचा गुणगौरव संपन्न






**बीड । प्रतिनिधी**

ज्या प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करून मराठी माणसाच्या मनात अस्मिता जागृत केली. त्याचप्रमाणे आदर्श शिक्षक सोमनाथ गिते सरांनी अबॅकसच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मनात असणारी गणिताची भीती दूर केली. त्याच बरोबर खऱ्या अर्थाने त्यांनी या सर्व विद्यार्थ्यांचा भावी जीवनाचा पाया भरण्याचे काम केले असल्याचे मत खालापुरी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. संभाजी सोनवणे यांनी गिते सरांच्या अबॅकस क्लासेसमध्ये आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज जयंती आणि अबॅकस परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांच्या गुणगौरव सोहळा कार्यक्रमाच्या प्रसंगी अध्यक्षीय स्थानावरून बोलताना व्यक्त केले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार श्री आत्माराम वाव्हळकर सर, यशवंत विद्यालयाचे आदर्श शिक्षक श्री कृष्णाचंद्र गाडेकर, आरोग्य संघटनेचे अध्यक्ष श्री भारत नागरगोजे साहेब तर पालक प्रतिनिधी म्हणून आदर्श शिक्षक श्री. प्रशांत मिसाळ, विद्यानिकेतन अकॅडेमीचे संचालक श्री. वैजिनाथ धेंडुळे आणि जी चॅम्प अबॅकसचे ब्रेन डेव्हलोपमेंट मास्टर श्री. सोमनाथ गिते सर आदी उपस्थित होते.

बीड शहरातील धानोरा रड परिसरात गेली पाच वर्षांपासून यशस्वीपणे सुरू असलेल्या गिते सरांच्या जी चॅम्प अबॅकस क्लासेसमध्ये बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आणि छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या अबॅकस नॅशनल लेव्हलच्या कॉम्पिटिशनमध्ये उज्ज्वल यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याच्या सुरुवातीला छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर अबॅकस जी चॅम्पियन या परीक्षेत यशस्वी झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह, मेडल देऊन सत्कार करण्यात आला. या वर्षीचा जी चॅम्प मराठवाडा विभागाचा बेस्ट अबॅकस टीचर अवार्ड श्री सोमनाथ गिते सरांना मिळाला. त्या बद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभानंतर चि. शिवतेज गिरे, चि. सत्यमेव सरपते, कु.भक्ती चौरे, कु. श्रुती वाव्हळकर, कु. श्रद्धा कागदे, चि. समर्थ मिसाळ या चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर भाषण केले. त्यानंतर श्री. गाडेकर सर, श्री. वाव्हळकर सर आणि श्री. धेंडुळे सर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर विचार व्यक्त केले तसेच या वेळी त्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे तोंडभरून कौतुक केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना केंद्रप्रमुख श्री. संभाजी सोनवणे सर यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या विषयी माहिती देताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातील घडामोडी गोष्टी रूपाने विद्यार्थ्यां समोर मांडल्या. यावेळी पुढे बोलताना श्री सोनवणे सर म्हणाले की, ज्या प्रमाणे छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य निर्माण करून मराठी माणसाच्या मनात अस्मिता जागृत केली. त्याचप्रमाणे आज आदर्श शिक्षक श्री सोमनाथ गिते सरांनी विद्यार्थ्यांच्या मनात गणिता विषयी असणारी भीती अबॅकसच्या माध्यमातून दूर केली. आज विद्यार्थ्यांना गणिता विषयी प्रचंड आवड निर्माण झाली आहे. त्यामुळे हे सर्व विद्यार्थी सध्या अगदी हसत–खेळत आणि आवडीने गणिताच्या क्रिया करू लागले आहेत. गणिताचे विविध उदाहरणे सोडवू लागले आहेत. श्री सोमनाथ गिते सरांनी घेतलेल्या कष्टामुळे भविष्यात हे विद्यार्थी गणित आणि इतर विषयात निश्चित निपून राहतील यात काही शंका नाही. वास्तविक पाहता खऱ्या अर्थाने श्री. सोमनाथ गिते सरांनी अबॅकसच्या माध्यमातून या सर्व विद्यार्थ्यांच्या जीवनाचा पाया भरण्याचे काम केले आहे. आज समाजातील सुज्ञ नागरिक आणि पालक श्री. सोमनाथ गिते सरांसारख्या गणित प्रिय आणि विद्यार्थी प्रिय आदर्श शिक्षकांना लाईक करत आहेत. विशेषत: आज समाजाला श्री. सोमनाथ गिते सर यांच्यासारख्या शिक्षकांची नितांत गरज निर्माण झाली असल्याचे श्री. संभाजी सोनवणे सर यांनी या सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सोमनाथ गिते यांनी तर आभार श्री मिसाळ सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी पालक आणि माता पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077